**05.09.2024** प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - तुम्हाला इथे प्रवृत्ती मार्गाचे प्रेम मिळते कारण बाबा हृदयापासून म्हणतात - 'माझ्या बाळांनो', बाबांकडून वारसा मिळतो, असे प्रेम देहधारी गुरु देऊ शकत नाहीत"

प्रश्नः- ज्या मुलांच्या बुद्धीमध्ये ज्ञानाची धारणा आहे, तीक्ष्ण बुद्धी आहे - त्यांची लक्षणे काय असतील?

उत्तरः- त्यांना दुसऱ्यांना ज्ञान ऐकवण्याची आवड असेल. त्यांची बुद्धी मित्र-नातेवाईक इत्यादींमध्ये भटकणार नाही. ज्यांची तीक्ष्ण बुद्धी असते, ते अभ्यासामध्ये कधी जांभई देणार नाहीत. मुरली क्लासमध्ये कधी डोळे बंद करून बसणार नाहीत. जी मुले तवाई (आळशी) होऊन बसतात, त्यांची बुद्धी इकडे-तिकडे भटकत राहते, त्यांना ज्ञान समजतच नाही, त्यांच्यासाठी बाबांची आठवण करणे खूप अवघड आहे.

ओम् शांती. हा आहे पिता आणि मुलांचा मेळावा. गुरु आणि चेले अथवा शिष्यांचा मेळावा नाही. या गुरु लोकांची दृष्टी असते की हे आपले शिष्य आहेत अथवा फॉलोअर्स किंवा जिज्ञासू आहेत. कमी लेखणारी दृष्टी झाली ना. ते त्या दृष्टीनेच बघतील, आत्म्याला बघणार नाहीत. ते बघतात शरीरांना आणि ते चेले देखील देह-अभिमानी होऊन बसतात. त्यांना आपला गुरु समजतात, दृष्टीच तशी राहते की, आमचे गुरु आहेत. ते गुरु विषयी आदर बाळगतात. इथे तर खूप फरक आहे, इथे बाबाच मुलांचा आदर ठेवतात. ते जाणतात या मुलांना शिकवायचे आहे. हे सृष्टी चक्र कसे फिरते. बेहदचा इतिहास-भूगोल मुलांना समजावून सांगायचा आहे. त्या गुरूंच्या हृदयामध्ये मुलांसारखे प्रेम असणार नाही. पित्याचे तर मुलांवर खूप प्रेम असते आणि मुलांचे देखील वडीलांवर प्रेम असते. तुम्ही जाणता बाबा तर आपल्याला सृष्टी चक्राचे ज्ञान ऐकवतात. ते (गुरु लोक) काय शिकवतात? अर्धा कल्प शास्त्र वगैरे ऐकवतात, भक्तीचे कर्मकांड करतात, गायत्री, संध्या इत्यादी शिकवत राहतात. हे तर बाबा (शिवबाबा) आलेले आहेत स्वतःचा परिचय देत आहेत. आपण तर बाबांना अजिबात जाणत नव्हतो. सर्वव्यापीच म्हणत होतो. कधीही विचारा - 'परमात्मा कुठे आहे?' तर लगेच म्हणतील - 'ते तर सर्वव्यापी आहेत'. मनुष्य तुमच्याकडे जेव्हा येतात तेव्हा विचारतात, 'इथे काय शिकवले जाते?' तुम्ही बोला, 'आम्ही राजयोग शिकतो, ज्याद्वारे तुम्ही मनुष्यापासून देवता अर्थात राजा बनू शकता आणखी कोणता सत्संग असा असणार नाही जो म्हणेल आम्ही मनुष्यापासून देवता बनण्याचे शिक्षण देतो'. देवता असतात सतयुगामध्ये. कलियुगामध्ये आहेत मनुष्य. आता आम्ही तुम्हाला साऱ्या सृष्टी चक्राचे रहस्य समजावून सांगतो, ज्यामुळे तुम्ही चक्रवर्ती राजा बनाल आणि मग तुम्हाला पावन बनण्याची खूप चांगली युक्ती सांगतो. अशी युक्ती कधी कोणी सांगू शकणार नाही. हा आहे सहज राजयोग. बाबा आहेत पतित-पावन. ते सर्वशक्तिमान देखील आहेत तर त्यांची आठवण केल्यानेच पापे भस्म होतील कारण योग अग्नी आहे ना. तर इथे नवीन गोष्ट शिकवतात.

हा ज्ञान मार्ग आहे. ज्ञान सागर एक बाबाच असतात. ज्ञान आणि भक्ती वेगवेगळी आहेत. ज्ञान शिकविण्यासाठी बाबांनाच यावे लागते कारण तेच ज्ञानाचे सागर आहेत. हे स्वतः येऊन आपला परिचय देतात की, 'मी सर्वांचा पिता आहे. ब्रह्मा द्वारे साऱ्या सृष्टीला पावन बनवतो'. पावन दुनिया आहे - सतयुग. पतित दुनिया आहे - कलियुग. तर सतयुग आदि आणि कलियुग अंताचे हे आहे - संगमयुग. याला 'लीप युग' म्हटले जाते. यामध्ये आपण जंप मारतो. कुठे? जुन्या दुनियेमधून नवीन दुनियेमध्ये जंप मारतो. ते तर शिडीवरून हळूहळू खाली उतरत आलो. इथे तर आपण घाणेरड्या दुनियेमधून नवीन दुनियेमध्ये एकदम जंप मारतो. सरळ वर निघून जातो. जुन्या दुनियेला सोडून आपण नवीन दुनियेमध्ये जातो. ही आहे बेहदची गोष्ट. बेहदच्या जुन्या दुनियेमध्ये प्रचंड प्रमाणात मनुष्य आहेत. नवीन दुनियेमध्ये तर फार थोडे मनुष्य असतात ज्याला स्वर्ग म्हटले जाते. तिथे सर्व पवित्र राहतात. कलियुगामध्ये सर्व आहेत अपवित्र. अपवित्र रावण बनवतो. हे तर सर्वांना समजावून सांगतात की, तुम्ही आता रावण राज्यामध्ये अथवा जुन्या दुनियेमध्ये आहात. खरे तर राम राज्यामध्ये होता ज्याला स्वर्ग म्हटले जात होते. मग ८४ चे चक्र फिरून खाली कसे कोसळले आहात, ते तर आम्ही सांगू शकतो. जे चांगले हुशार असतील ते लगेच समजतील, ज्यांच्या डोक्यात येणार नाही ते तर वेड्यासारखे इकडे-तिकडे बघत राहतील. लक्ष

देऊन ऐकणार नाहीत. असे म्हणतात ना - 'तू तर जसा आळशी आहेस'. संन्यासी लोक देखील जेव्हा कथा बसून ऐकवतात तेव्हा तर कोणी डुलकी काढतात किंवा दुसरीकडेच लक्ष असते; तर अचानक त्यांना विचारतात की, 'काय ऐकवले?' बाबा देखील सर्वांना बघत राहतात. कोणी आळशासारखे तर बसलेले नाहीत ना. चांगले तीक्ष्ण बुद्धीवाले जे असतात ते शिकताना कधी जांभई इत्यादी देणार नाहीत. शाळेमध्ये कधी कोणी डोळे बंद करून बसेल हा तर नियम नाही आहे. ज्ञानाला काहीच समजत नाहीत. बाबांची आठवण करणे, त्यांच्यासाठी खूप अवघड आहे, मग पापे कशी नष्ट होतील. तीक्ष्ण बुद्धीवाले तर चांगल्या रीतीने धारण करून ते मग इतरांना देखील ऐकवण्याची त्यांना आवड असते. ज्ञान नसेल तर बुद्धी मित्र-नातेवाईकांमध्ये भटकत राहते. इथे तर बाबा म्हणतात - बाकी सर्वकाही विसरून जायचे आहे. शेवटी कशाचीच आठवण येता नये. बाबांनी (ब्रह्मा बाबांनी) संन्याशी इत्यादींना बघितले आहे जे पक्के ब्रह्मज्ञानी असतात, ते पहाटे असे बसल्या-बसल्या ब्रह्म महतत्वाची आठवण करता-करता शरीर सोडतात. त्यांच्या शांतीचा प्रभाव खूप पडतो. परंतु ते ब्रह्ममध्ये लीन तर होऊ शकत नाहीत. पुन्हा मग मातेच्या गर्भामध्ये जन्म घ्यावा लागतो.

बाबांनी समजावून सांगितले आहे की, वास्तविक महात्मा तर श्रीकृष्णाला म्हटले जाते. मनुष्य तर अर्थ न समजता फक्त म्हणतात. बाबा समजावून सांगत आहेत - 'श्रीकृष्ण आहे संपूर्ण निर्विकारी, परंतु त्याला संन्यासी नाही, तर देवता म्हटले जाते'. संन्यासी म्हणणे किंवा देवता म्हणणे त्याचा देखील अर्थ आहे. हा (ब्रह्मा बाबा) देवता कसा बनला? संन्याशापासून देवता बनला. बेहदचा संन्यास केला मग निघून गेले नवीन दुनियेमध्ये. ते (या दुनियेतील संन्यासी) तर हदचा संन्यास करतात. बेहदमध्ये जाऊ शकत नाहीत. हद मध्येच विकारातून पुनर्जन्म घ्यावा लागतो. बेहदचा मालक बनू शकत नाही. राजा-राणी कधी बनू शकत नाही कारण त्यांचा धर्मच वेगळा आहे. संन्यास धर्म काही देवी-देवता धर्म नाहीये. बाबा म्हणतात - 'मी अधर्माचा विनाश करून देवी-देवता धर्माची स्थापना करतो'. विकार हा देखील अधर्म आहे ना, म्हणूनच बाबा म्हणतात - 'या सर्वांचा विनाश आणि एका आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना करण्यासाठी मला यावे लागते'. भारतामध्ये जेव्हा सतयुग होते तेव्हा एकच धर्म होता, तोच धर्म मग अधर्म बनतो. आता तुम्ही पुन्हा आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना करत आहात. जे जितका पुरुषार्थ करतील तितके उच्च पद प्राप्त करतील. स्वतःला आत्मा निश्चय करायचा आहे. भले गृहस्थ व्यवहारामध्ये रहा. त्यातूनही जितके शक्य असेल उठता-बसता हे पक्के करा, जसे भक्त लोक पहाटे उठून एकांतामध्ये बसून माळ जपतात, तुम्ही तर संपूर्ण दिवसाचा हिशोब काढता. अमक्या वेळेला इथे इतकी आठवण केली, पूर्ण दिवसामध्ये इतका वेळ आठवण राहिली, टोटल काढता. ते तर पहाटे उठून माळ जपतात, जरी ते काही खरे भक्त नसतात. काही लोकांची बुद्धी तर बाहेर कुठे-कुठे भटकत राहते. आता तुम्ही समजता भक्तीने तर फायदा काहीच मिळणार नाही. हे तर आहे ज्ञान, ज्यामुळे खूप फायदा होतो. आता तुमची आहे चढती कला. बाबा वारंवार म्हणतात - मनमनाभव. गीतेमधील देखील हा शब्द आहे परंतु त्याचा अर्थ कोणीही सांगू शकणार नाही. उत्तर देता येणार नाही. वास्तविक त्याचा अर्थ लिहिलेला देखील आहे - 'स्वतःला आत्मा समजून, देहाचे सर्व धर्म सोडून मामेकम् (मज एकाची) आठवण करा'. भगवान उवाच आहे ना. परंतु त्यांच्या बुद्धीमध्ये आहे श्रीकृष्ण भगवान. तो तर देहधारी पुनर्जन्मामध्ये येणारा आहे. त्याला भगवान कसे म्हणू शकतो. तर संन्यासी इत्यादी कोणाचीही दृष्टी पिता आणि मुलांची असू शकत नाही. भले गांधीजींना बापूजी म्हणत होते परंतु वडील आणि मुलाचे नाते म्हणता येणार नाही. ते तर तरीपण साकार झाले ना. तुम्हाला तर समजावून सांगितले आहे स्वतःला आत्मा समजा. यामध्ये जे बाबा बसले आहे ते आहेत बेहदचे बापूजी. लौकिक आणि पारलौकिक दोन्ही पित्याकडून वारसा मिळतो. बापूजींकडून (गांधीजींकडून) तर काहीच मिळाले नाही. अच्छा, भारताची राजधानी परत मिळाली परंतु याला वारसा तर म्हणणार नाही. सुख मिळाले पाहिजे ना.

वारसा मिळतोच दोघांकडून - एक हदच्या पित्याचा, दुसरा बेहदच्या पित्याचा. ब्रह्मा कडून तर कोणताही वारसा मिळत नाही. भले साऱ्या प्रजेचे ते पिता आहेत, त्यांना म्हणतात - ग्रेट-ग्रेट ग्रँड फादर. ते स्वतः म्हणतात - 'माझ्याकडून तुम्हाला कोणताही वारसा मिळत नाही'; जर हे स्वतः म्हणतात की, माझ्याकडून कोणताही वारसा मिळू शकत नाही; तर मग त्या बापूजीं कडून काय वारसा मिळू शकणार. काहीच नाही. इंग्रज तर निघून गेले. आता काय आहे? उपोषण, धरणे, संप इत्यादी होत राहतात, किती मारामाऱ्या होत राहतात. कोणाचीच भीती राहिलेली नाही आहे. मोठ-मोठ्या ऑफिसर्सना देखील मारून टाकतात. सुखा ऐवजी अजूनच दुःख आहे. तर बेहदची गोष्ट इथेच आहे. बाबा म्हणतात - सर्वप्रथम हा पक्का निश्चय करा की, आपण आत्मा आहोत, शरीर

नाही. बाबांनी आम्हाला दत्तक घेतले आहे, आपण दत्तक मुले आहोत. तुम्हाला समजावून सांगितले जाते की, ज्ञानाचा सागर बाबा आलेले आहेत आणि ते सृष्टी चक्राचे रहस्य समजावून सांगतात. दुसरे कोणीही समजावून सांगू शकणार नाही. बाबा म्हणतात - 'देहासहित देहाच्या सर्व धर्मांना विसरून, मामेकम् (मज एकाची) आठवण करा'. सतोप्रधान जरूर बनावे लागेल. हे देखील जाणता जुन्या दुनियेचा विनाश तर होणारच आहे. नवीन दुनियेमध्ये खूप थोडे असतात. कुठे इतके करोडो आत्मे आणि कुठे ९ लाख. इतके सर्वजण कुठे जातील? आता तुमच्या बुद्धीमध्ये आहे की आपण सर्व आत्मे वरती होतो. मग इथे आलो आहोत पार्ट बजावण्यासाठी. आत्म्यालाच ॲक्टर म्हणणार. आत्मा ॲक्ट करते या शरीरासोबत. आत्म्याला ऑर्गन्स तर पाहिजेत ना. आत्मा किती छोटी आहे. ८४ लाख जन्म काही नाही आहेत. प्रत्येकजण जर ८४ लाख जन्म घेईल तर मग पार्ट रिपीट कसा करतील. आठवण राहू शकणार नाही. स्मृतीतून निघून जाईल. ८४ जन्म सुद्धा तुमच्या लक्षात राहत नाहीत, विसरून जाता. आता तुम्हा मुलांना बाबांची आठवण करून पवित्र जरूर बनायचे आहे. या योग अग्नीद्वारे विकर्म विनाश होतील. हा देखील निश्चय आहे - बेहदच्या बाबांकडून बेहदचा वारसा आपण कल्प-कल्प घेतो. आता पुन्हा स्वर्गवासी बनण्यासाठी बाबांनी सांगितले आहे की, 'मामेकम् (मज एकाची) आठवण करा, कारण मीच पतित-पावन आहे'. तुम्ही बाबांना बोलावले आहे ना, तर आता बाबा आले आहेत पावन बनविण्यासाठी. पावन असतात - देवता, पतित असतात - मनुष्य. पावन बनून मग शांतिधाममध्ये जायचे आहे. तुम्ही शांतिधाममध्ये जाऊ इच्छिता की सुखधाममध्ये येऊ इच्छिता? संन्यासी तर म्हणतात - 'सुख कागविष्ठा समान आहे, आम्हाला शांती पाहिजे'. तर ते सतयुगामध्ये कधी येऊ शकणार नाहीत. सतयुगामध्ये होता प्रवृत्ती मार्गाचा धर्म. देवता निर्विकारी होते तेच पुनर्जन्म घेत-घेत पतित बनतात. आता बाबा म्हणतात - 'निर्विकारी बनायचे आहे. स्वर्गामध्ये यायचे असेल तर माझी आठवण करा तर तुमची पापे नष्ट होतील, पुण्य-आत्मा बनाल मग शांती-धाम, सुख-धाममध्ये जाल. तिथे शांती देखील होती, सुख देखील होते. आता आहे दुःख-धाम. बाबा परत येऊन सुखधामची स्थापना करतात, दुःख-धामचा विनाश. चित्रे देखील समोर आहेत. बोला, 'तुम्ही कुठे उभे आहात?' आता आहे कलियुगाचा अंत, विनाश समोर उभा आहे. बाकी जाऊन थोडासा तुकडा राहील. इतके खंड तर तिथे असत नाहीत. ही सर्व वर्ल्डची हिस्ट्री-जिओग्राफी बाबाच बसून समजावून सांगतात. ही पाठशाळा आहे. भगवानुवाच, सर्वप्रथम बाबांचा परिचय द्यावा लागतो. आता कलियुग आहे मग सतयुगामध्ये जायचे आहे. तिथे तर सुखच सुख असते. एकाचीच आठवण करणे - ही आहे अव्यभिचारी आठवण. शरीराला देखील विसरायचे आहे. शांतीधाम मधून आलो आहोत परत शांतिधाममध्ये जायचे आहे. तिथे कोणीही पतित जाऊ शकत नाही. बाबांची आठवण करत-करत पावन बनून तुम्ही मुक्तिधाममध्ये निघून जाणार. हे बसून व्यवस्थित समजावून सांगावे लागते. आधी इतकी सारी चित्रे थोडीच होती. चित्रा शिवाय देखील शॉर्टमध्ये समजावून सांगितले जात होते. या पाठशाळेमध्ये मनुष्यापासून देवता बनायचे आहे. हे आहे नवीन दुनियेसाठी नॉलेज. ते बाबाच देतील ना. तर बाबांचे मुलांवर लक्ष असते. आम्हा आत्म्यांना शिकवतात. तुम्ही देखील सांगता - बेहदचे बाबा आम्हाला समजावून सांगतात, त्यांचे नाव आहे शिवबाबा. फक्त 'बेहदचे बाबा' म्हटले तर गोंधळून जातील कारण असे 'बाबाजी' तर खूप झाले आहेत. म्युनिसिपालिटीच्या मेयरला देखील 'बाबा' म्हणतात. बाबा म्हणतात - 'मी याच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) येतो तरी देखील माझे नाव 'शिव'च आहे. मी या रथाद्वारे तुम्हाला नॉलेज देतो, यांना ॲडॉप्ट केले आहे. यांचे नाव ठेवले आहे प्रजापिता ब्रह्मा. यांना देखील माझ्याकडून वारसा मिळतो'. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आता जुन्या दुनियेतून नवीन दुनियेमध्ये जंप घेण्याची वेळ आहे त्यामुळे या जुन्या दुनियेपासून बेहदचा संन्यास करायचा आहे. याला बुद्धीने विसरून जायचे आहे.
2. २) पूर्णत: अभ्यासावर लक्ष द्यायचे आहे. शाळेमध्ये डोळे बंद करून बसणे - हा नियम नाही आहे. लक्षात असावे - मुरली क्लासच्या वेळी बुद्धी इकडे-तिकडे भटकू नये, जांभई येऊ नये. जे ऐकत जाल ते धारण होत जावे.

वरदान:- रुहानी नशेद्वारे जुन्या दुनियेला विसरणारे स्वराज्य सो विश्व राज्य अधिकारी भव

संगम युगावर जे बाबांच्या वारशाचे अधिकारी आहेत तेच स्वराज्य आणि विश्व राज्य अधिकारी

बनतात. आज स्वराज्य आहे उद्या विश्वाचे राज्य असेल. आज आणि कालची गोष्ट आहे, अशी अधिकारी आत्मा रुहानी नशेमध्ये राहते, ती बाकीचा नशा, जुन्या दुनियेला सहजच विसरून जाते. अधिकारी कधीही कोणत्या वस्तूच्या, व्यक्तीच्या, संस्कारांच्या अधीन होऊ शकत नाही. त्यांना हदच्या गोष्टी सोडाव्या लागत नाहीत, त्या आपणहून सुटतात.

बोधवाक्यः- प्रत्येक सेकंद, प्रत्येक श्वास, प्रत्येक खजिन्याला सफल करणारे सफलतामूर्त बनतात.

||| ओम शांती |||